# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक ३३२-२२** **दिनांक ०७/११/२०२२**

## घरफोडी चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करुन २६,६०,०००/- रुपये किंमतीची रोख रक्कम व सोन्याचे दागीने हस्तगत- गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा यांची कामगिरी.

दिनांक ०४.११.२०२२ रोजी रात्री ०९:०० ते ११-१५ वाजताच्या दरम्यान, बी/६०४ बी/विंग, विंगस्टोन बिल्डींग, १५ नंबर बस स्टॉप, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे येथे फिर्यादी श्रीमती तरन्नुम जावेद खान वय ३० वर्ष, रा. वरील प्रमाणे यांचे रहाते घरातुन घराचे लॅच तोडुन घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले १) २५,००,०००/-रु. रोख ५०० रुपयांच्या भारतीय चलनाच्या नोटा, २) १,२०,०००/- रु. किमतीचे ३० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जु.वा. ३) ४०,०००/-रु. किमतीचे १० ग्रॅम वजनाचे कानातील झुमके जु.वा. असा एकुण - २६,६०,०००/-रु. किमतीची रोख रक्कम व सोन्याचे दागीने अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले बाबत दिले फिर्यादी वरुन मिरारोड पोलीस ठाण्यात **गु.रजि.क्रः-** ४५६/२२ भा.द.वि.स. कलम ४५७, ३८० प्रमाणे दिनांक ०५/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष-१ काशिमीरा यांचेकडून गुन्हयाचे घटनास्थळाची पाहणी करुन घटनास्थळावरुन मिळुन आलेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे व फिर्यादीकडुन तपासात मिळून आलेल्या माहितीप्रमाणे सदरचा गुन्हा हा फिर्यादी यांचा भाऊ फरमान जावेद खान, व्यवसाय रिक्षा ड्रायव्हर, सध्या रा. प्लॉट नं. २०, मालवणी गेट नं.५, मदर टेरेसा स्कुल जवळ, मालवणी मालाड, प. याने केला असल्याचा संशय आल्याने सदर संशयित याचा शोध घेता तो त्याची पत्नी व मुलगा व मेहुणी सोबत कोठेतरी निघुन गेला असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीच्या अनुषंगाने संशयित याचा सदर ठिकाणी मिळालेल्या तांत्रिक माहितीनुसार गुन्हे शाखा कक्ष-१ चे अधिकारी व अंमलदार यांच्या तीन वेगवेगळया टिम तयार करुन तपास पथके शोध घेण्याकामी पाठविण्यात आले. सदर टिमकडून वेगवेगळया रेल्वे स्टेशन वरुन मिळविण्यात आलेल्या तांत्रिक माहितीचे विश्लेषण करुन आरोपीत हा गुजरात राज्यात पळुन जात असल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे तपास पथकाने आरोपीत याचा वापी, सुरत, वलसाड परिसरात शोध घेत असतांना आरोपीत हा वलसाड, राज्य गुजरात येथे मिळुन आल्याने त्यास दिनांक ०६/११/२०२२ रोजी ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीत याचे कडुन सदर गुन्हयांतील घरफोडी चोरी करुन नेलेल्या मालमत्तेतील २५,२४,५००/-रुपये रोख रक्कम व गुन्हयांत वापरलेले ०६ मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा कक्ष १ काशिमीरा नेमणुकीतील पो.नि. अविराज कुराडे,

स.पो.नि.पुष्पराज सुर्वे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सफौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, पो.हवा.संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, सचिन सावंत, समीर यादव, प्रशांत विसपुते, पो.शि. सनी सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

